REVIEW OF RESEARCH

IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# द. मा. मिरासदार — एक उत्तम साहित्यिक

**डॉ. हरिश्चंद्र मधुकर गायकवाड**
मराठी विभाग प्रमुख , शिक्षणमहर्षी गुरूवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालय,परांडा,
तालुका —परांडा जिल्हा.उस्मानाबाद.

## प्रस्तावना.



मराठी साहित्यकृती अजरामर होण्यामागे अनेक मराठी लेखकांनी आपल्या लेखनीच्या माध्यमातून प्रयत्न केले. अगदी सरुवातीपासून म्हणजेच संत ज्ञानेश्वर,नामदेव ते पु. ल. देशपांडे, प्र. के. अत्रे, अण्णाभाउ साठे इथपर्यंतची सारी भली मोठी यादी होईल. आजही मराठी साहित्यक उत्तोमोत्तम साहित्य निर्मिती करताना आपण पाहत आहोत. वेगवेगळया साहित्य प्रकारातून त्यांनी साहित्य रसीकांना मंत्रमुग्ध केले आहे. द.मा.मिरासदार हे देखील एक उत्तम साहित्यिकापैकीच एक आहेत. त्यांचा लेखन प्रवास पाहिला तर आपणास त्याची प्राचिती येईल. द.मा.मिरासदारांनी कथा,ग्रामीण साहित्य,विनोदी शैली या साहित्य प्रकारात उत्तम यश मिळवले. ते उत्तम कथाकथन करणारे अवलिया आहेत. त्यांचा लेखनप्रवास पाहणे एक पर्वणीच आहे.

द.मा.मिरासदार हे एक विनोदी लेखक व कथाकथनकार आहेत. ते स्वत: मराठी विषयाचे अध्यापन करत. त्यांचा जन्म अकलूज येथे १४ एप्रिल १९२७ रोजी झाला. प्रामुख्याने त्यांचे कार्यक्षेत्र नाटक व साहित्य होते. व्यंकटेश माडगुळकर,शंकर पाटील आणि द.मा.मिरासदार ही त्रयी १९६२ पासून महाराष्टाच्या निरनिराळया भागात कथाकथन करीत असत. मराठीतील रा.ग.गडकरी ,अत्रे, देशपांडे,कोल्हटकर यांची विनोदी लेखनाची परंपरा द.मा.मिरासदार यांनी पुढे चालू ठेवली. वाचक रसिकांना त्यांच्या कथा आजही तेवढयाच भुरळ घालतात. त्यांनी लिहिलेल्या काही कथा या मराठी साहित्य विश्वात अजरामर झाल्या. त्यापैकी काही कथा म्हणजे व्यंकूची शिकवण,माइया बापाची पेंड,शिवाजीचे हस्ताक्षर,भुताचा जन्म,माझी पहिली चोरी इत्यादी. त्याचबरोबर द.मा. मिरासदार यांनी इतर काही गाजलेले कथासंग्रह लिहिले. त्यांच्या लेखन साहित्यात इतर लेखन म्हणजे गप्पागोष्टी, गुदगुल्या ,मिरासदारी असे २४कथासंग्रह १८ विनोदी चित्रपटांच्या पटकथा त्यांच्या नावावर आहेत.

विनोदी कथा लेखनाबरोबरच त्यांनी काही गंभीर कथा देखील लिहिल्या उदा. स्पर्श,विरुंगुळा,कोणे एके काळी इत्यादी. या कथेतून त्यांनी कारूण्य अचूकपणे मांडले होते. विनोदी व गंभीर कथा लेखनाबरोबरच त्यांनी लेख संग्रह ,बाल.नाटिका ,बाल.साहित्य,कादंबरी ,कथासंग्रह,वगनाटय,ललित लेखसंग्रह इत्यादी लेखन प्रकारात उत्तम साहित्य निर्मिती केली. त्यांच्या चौफेर लेखन साहित्याची काही वैशिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

## द.मा.मिरासदार यांच्या लेखनाची काही वैशिष्टये.

१ द.मा.मिरासदार यांचे लेखन प्रामुख्याने विनोदी छटा असणारे आहे. त्यांनी आपल्या विनोदी लेख व कथा लेखनातून मराठी मनाची यथेच्छ करमणूक केली. त्यांच्या विनोदी कथा या विशेष लोकप्रिय झाल्या.
२ द.मा.मिरासदार यांचे लेखनात ग्रामीण जीवनाचे चित्रण पुरेपुर पहायला मिळते.ग्रामीण जीवनातील प्रसंग,व्यक्ती त्यांच्या त—हा त्यांनी अचुकपणे टिपल्या .ग्रामीण भागातील जीवनशैलीवर विनोदी पदधतीने टिपण्णी केली.
३ ग्रामीण साहित्य,मराठी साहित्य तळागळातील लोकांपर्यंत पोहचाविण्याचे कार्य द.मा.मिरासदार यांच्या करमणुकप्रधान कथा साहित्याने केले. रसिक प्रेक्षक त्यांच्या कथा आवडीने वाचू लागले. साहित्यातून विरंगुळा करण्याचे कार्य द.मा.मिरासदार यांच्या साहित्यकृतीने केले.
४ मिरासदारांच्या बहुतेक कथा ग्रामीण जीवनावर आधारित आहेत. त्यांनी या कथांमधून ग्रामीण जीवनातील विसंगतीचे,विक्षिप्त पणाचे आणि इरसालपणाचे दर्शन घडवून त्यातील विनोद मिरासदारानी आपल्या कथांमधून फुलविला. गावरान पात्रे त्यांनी अत्यंत खुबीने आपल्या कथासंग्रहातून लोकांसमोर,वाचकांसमोर मांडली. काही उल्लेखनीय ग्रामीण पात्रे म्हणजेच गणा मास्तर,बाबू पैलवान,नाना चेंगर इत्यादी.
५ द.मा.मिरासदार यांच्या विनोदी कथा रसिकाना आवडण्याचे कारण म्हणजे त्यांनी चित्रण केलेली पात्रे त्यातल्या त्यात ग्रामीण पात्रांची मांडणी हे त्यांच्या विनोदी कथेची सर्वात जमेची बाजू आहे. ही पात्रे एकाहून एक अस्सल,इब्लीस ,बेरकी,टारगट आणि काहीशी भोळसर देखील आहेत. त्यांनी ती हुबेहुब चित्रीत केली म्हणूनच त्यांना भरघोस हश्या व टाळया मिळाल्या.
६ मिरासदार हे उत्तम कथाकथनकार होते त्यामुळे त्यांच्या लेखनीतून पात्रे मांडत असताना हुबेहुब वर्णन लिहित. त्यामुळेच ती पात्रे रसिकांना आपल्या जवळची वाटतात. कथाकथन करण्यासाठी द.मा.मिरासदार यांनी लिहिलेल्या कथांना खुप मागणी आहे.
७ द.मा.मिरासदार यांच्या विनोदी कथा लेखनामुळे विनोदी लेखन साहित्याला पुन्हा एकदा मानाचे स्थान मराठी साहित्य व रसिकांच्या मनात मिळाले.

मिरासदार यांनी आपल्या लेखनशैलीच्या जोरावर मराठी रसिक साहित्याच्या मनावर अधिराज्य गाजविले. प्र.के.अत्रे, पु.ल. देशपांडे यांच्यानंतर त्यांचे नाव आदराने घेतले जाते. अस्सल ग्रामीण बाज त्यांनी आपल्या विनोदी लेखनशैलीतून रसिकांसमोर मांडला. त्यांच्या लेखनीतून निर्माण झालेली ग्रामीण भागातील पात्रे अजरामर झाली. मराठी साहित्य प्रकारातील विविध क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटविला. शासन व लोकांनी त्यांचा गौरव केला. द.मा.मिरासदार हे मराठी साहित्यातील उत्तम लेखक म्हणून प्रसिदध आहेत.

## संदर्भग्रंथसूची

१ मिरासदार द.मा १९८३ ,भोकरवाडीच्या गोष्टी, कथा संग्रह मेहता प्रकाशन
२ दत्ताराम मारूती मिरासदार.विकिपिडिया
३ मिरासदाराच्या दमादमाच्या गोष्टी Loksatta.com